ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १०　　पुणें, बुधवार तारीख ३१ मार्च, १९५४　　अंक १३

## विविध माहिती

**कामगार कारखाना चालविण्यास तयार**—हैद्राबाद येथील जुनी कापडाची गिरणी गेले कित्येक महिने बंद आहे. गिरणी बंद झाल्यामुळें १७,०० कामगार बेकार झाले आहेत. सरकारनें गिरणीला १० लाख रुपयांचें कर्ज देऊं केल्यास कामगार गिरणी स्वतःच्या जबाबदारीवर चालविण्यास तयार आहेत, असें श्री. सत्यनारायण रेड्डी या कामगार-पुढाऱ्यानें सरकारांस कळविलें आहे.

**बंगालमधील बुडालेल्या बँका**—बंगालमधील ८० बँकांचें कामकाज सध्यां बंद असून त्या गुंडाळण्याचें कायदेशीर काम चालू आहे. ह्या कामासाठी एक स्वतंत्र लिक्विडेटरच नेमण्यांत आला असून तो पुढील महिन्याच्या मध्याच्या सुमारास आपल्या कामावर रुजूं होईल आणि बँकांची कायदेशीर विल्हेवाट लावण्यास प्रारंभ करील.

**हिंदी ग्रंथकारांना बक्षिसें**—रेवा येथें प्रसिद्ध हिंदी ग्रंथकारांना बक्षिसें देण्याचा समारंभ विंध्य-प्रदेशचे गव्हर्नर श्री. के. संतानम् ह्यांच्या हस्तें पार पडला. ८,२०० रुपयांचीं एकूण २६ बक्षिसें देण्यांत आलीं. 'महात्माजींचें जीवन व शिकवण' ह्या ग्रंथाचे कर्ते श्री. गोपाळ शरणलिंग ह्यांना सर्वांत मोठें म्हणजे २,१०० रुपयांचें बक्षिस देण्यांत आलें.

**पांच फूट उंचीचीं टोमॅटोचीं झाडें**—द. आफ्रिकेंतील मि. जॅक बेस्टर ह्या बागवानानें टोमॅटोचीं ५ फूट उंचीचीं झाडें तयार केलीं आहेत. प्रत्येक झाड सुमारें ४० पौंड वजनाचें टोमॅटोचें पीक देतें. सामान्य झाड अवघें ६ ते ७ पौंड वजनाचे टोमॅटो देतें. नवीन झाडाचीं पानें सामान्य झाडापेक्षा ४ पट मोठीं आहेत आणि त्यांचीं मुळें तीन फूट लांबीचीं आहेत.

**ऑस्ट्रेलिआला भारताचा चहा**—ऑस्ट्रेलिआंत भारताचा चहा खपविणें योग्य प्रयत्न झाल्यास सहज शक्य आहे, असे उद्गार ऑस्ट्रेलिअन टी कॉर्पोरेशन बोर्डाचे कंट्रोलर मि. बेनेट ह्यांनीं काढले. युद्धापूर्वी ऑस्ट्रेलिआंत खपणाऱ्या चहापैकीं ७० टक्के चहा इंडोनेशिआंतून आयात झालेला असे. हल्लीं सिलोनचा चहा अधिक येऊं लागल्याची माहितीहि त्यांनीं दिली.

**विमानाचा अपघात व विमा**—सिंगापूर येथें बी. ओ. ए. सी. कंपनीचें कॉमेट विमान नुकतेंच कोसळलें. ह्या अपघातापायीं ब्रिटिश विमा कंपन्यांना ६,००,००० पौंड द्यावे लागणार आहेत. प्रत्यक्ष विमानाचा ५,००,००० पौंडांचा विमा उतरविण्यांत आला होता. अपघातांत मरण पावलेल्यांच्या वारसांना प्रत्येकीं ३,००० पौंड द्यावे लागतील ते वेगळेंच. चालू वर्ष विमा कंपन्यांच्या दृष्टीनें फार वाईट गेलें.

**भारतासाठीं कॅनडाचें तांबें**—भारताच्या विकास योजनेंत वापरण्यासाठीं कॅनेडिअन सरकारनें ५० लाख डॉलर्सचें तांबें देण्याचें कबूल केलें आहे. ह्याच रकमेंतून कांहीं अल्युमिनमहि घेण्यांत येणार आहे. कोलंबो योजनेप्रमाणें भारताला जी मदत मिळावयाची आहे, तीमधीलच हा एक भाग आहे.

**परदेशी कंपन्यांची विक्री**—लोकसभेंत अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, १९५३ च्या एप्रिल ते डिसेंबर ह्या कालांत परदेशीय कंपन्यांच्या विक्रीपायीं ५८.४७ लाख रुपये भारतांतून परदेशीं पाठविण्यांत आले. जानेवारी ते मार्च अखेरच्या कामासंबंधीं ही माहिती उपलब्ध नाहीं.

**खाद्यपदार्थांची रेलचेल**—अमेरिकेंतील गुदामांतून मागणी नसलेले हजारों टन खाद्यपदार्थ पडून आहेत. ह्या मालांत लोणी, खवा, सुकें दूध आणि इतर पदार्थ आहेत. सध्यांच सरकारनें खरेदी केलेला १,५०,००० टन खवा, २,६१,००० टन सुकें दूध गिऱ्हाइकांच्या अभावीं पडून आहे. ह्या मालाला गिऱ्हाईक न मिळालें, तर उत्पादनावर नियंत्रण घालावें लागणार आहे.

**कैद्यांनीं केलेली बचत**—येरवडा येथील तुरुंगाधिकाऱ्यांनीं व नॅशनल सेव्हिंग्ज संघटनेच्या अधिकाऱ्यांनीं कैद्यांमध्यें पैसे वाचविण्याविषयीं प्रचार-मोहीम उघडली होती. ह्या प्रचाराचें फळ म्हणून कैद्यांनीं ४,००० रुपयांचीं सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स घेतलीं आहेत. त्यांनीं केलेल्या बचतीचा हा पहिला हप्ता आहे.

**ग्रामपंचायतीची सुधारणा**—खानापूर तालुक्यांतील हळशी गांवच्या ग्रामपंचायतीनें खेड्यांतील प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांना स्वखर्चानें दूध पुरविण्यास सुरवात केली आहे. गांवांतील शाळांत २०० विद्यार्थी शिकत आहेत. त्यांना दररोज एक कप दूध पिण्यास देण्यांत येतें. अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम आहे.

**अल्प बचतीचें यश**—कॅनरा जिल्ह्यांत गेल्या महिन्यांत अल्प बचतीच्या योजनेस चांगलें यश आलें. लोकांनीं १ लाख रुपयांचीं बचतीचीं सर्टिफिकेटस विकत घेतलीं. सुमारें ७८,६०० रुपये किंमतीचीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस आणि २६,९०० रुपयांच्या ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिटसची विक्री करण्यांत आली.

**अलाहाबादची ड्रेनेजची योजना**—अलाहाबाद म्युनिसिपल बोर्डानें शहरासाठीं ड्रेनेज बांधण्याची एक योजना तयार करून ती उत्तरप्रदेश सरकारकडे मंजुरीसाठीं पाठविली होती. योजना मंजूर झाली असून तीसाठीं सरकार ७,५०,००० रुपये कर्जाहि देणार आहे. नव्या योजनेमुळें नागरिकांवरील कराचा बोजा मात्र वाढणार नाहीं.

## दि रत्नाकर बँक लि. कोल्हापूर

वरील बँकेस १९५३ सालीं ४८,८०६ रु. नफा झाला. त्यांत मागील शिल्लकी नफा मिळविला, म्हणजे नफावाटणीस ४८,८८२ रु. आले. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करण्यांत आला :—

| | रु. |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | १२,००० |
| डिफर्ड शेअर्सवर प्रत्येकी १६ रु. ६ आ. | |
| वजा, प्रत्येक रुपयांत प्रमाणें ०–४–० कर, डिव्हिडंड | १,३८६ |
| ऑर्डिनरी शेअर्सवर ३% करमाफ डिव्हिडंड | १४,९३१ |
| कर–तरतूद व पुढील वर्षासाठी बाकी | २०,५६५ |
| | ४८,८८२ |

१९५२ च्या मानानें १९५३ सालीं बँकेकडील मुदती ठेवींत वाढच झाली आहे आणि एकूण ठेवींतहि सुधारणा दिसत आहे. सोन्याचे दागिने व तयार माल ह्यांच्या तारणावरील कर्जास प्राधान्य देण्याचें चालकांचें धोरण आहे. विगर–तारणाच्या कर्जावरील व्याजाच्या दरांत घट झाली तरी उत्पन्नाचें प्रमाण कायम राहिलें. जयसिंगपूर शाखेंत एक लहान सेफ्टी व्हॉल्ट बसविण्यांत आला आहे. ( चेअरमन : बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : एल. एन्. शहा, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. )

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,०३,३०० | कॅश, बँकांत | १४,९१,१६३ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ९९,०८१ | इन्व्हेस्टमेंटस | १२,११,९०६ |
| ठेवी | ४२,५७,३८९ | कर्जें | २१,२५,०५६ |
| नफा | ४८,८८२ | | |

---

## पूर्व–पश्चिम व्यापाराची शक्यता

ब्रिटनचे पंतप्रधान, सर विन्स्टन चर्चिल, ह्यांनीं पार्लमेंटमध्यें बोलतांना पूर्व युरोपमधील देश आणि प. युरोप ह्यांच्यांत अधिक प्रमाणावर व्यापार सुरू होण्यावर भर दिला होता. मि. चर्चिल ह्यांच्या ह्या ताज्या भाषणाचें राशिआंत स्वागत झाल्याचें समजतें. जिनीव्हा येथें संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या युरोपीय आर्थिक कमिशनचें नववें अधिवेशन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. ह्या अधिवेशनला राशिआ व पूर्व युरोपांतील देश ह्यांनीं भरगच्च प्रतिनिधी पाठविले होते. ह्यावरूनहि पूर्व–पश्चिम व्यापार वाढविण्याच्या धोरणाविषयीं अधिक बळकटी वाटूं लागते. अधिवेशनांत स्पेन सोडून इतर सर्व युरोपिअन देश भाग घेत आहेत. पूर्व आणि प. युरोप ह्यांच्यामधील व्यापारी संबंध वाढविण्याच्या दृष्टीनें जिनीव्हा येथें आपल्या कायमच्या व्यापारी कचेऱ्या उघडण्याचेंहि राशिआ आदिकरून देशांनीं ठरविलें आहे, असें समजतें. ह्या अधिवेशनांत एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा होणार असल्याची बातमी आहे. जागतिक बँक व ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आदिकरून उद्योगदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांच्या सहकार्यानें व मदतीनें द. युरोपची आर्थिक उन्नति घडवून आणण्याची एक योजना अधिवेशनापुढें मांडण्यांत येणार आहे. ही योजना युरोपीय आर्थिक कमिशनच्या कचेरीनें तयार केली आहे. तींत असें सुचविण्यांत आलें आहे कीं, उत्तर युरोपमधील औद्योगिक देशांनीं जागतिक बँकेच्या पाठिंब्यानें दक्षिण युरोपमधील राष्ट्रांना औद्योगिक व शेतीविषयक दीर्घ मुदतीचीं कर्जें द्यावीं; आणि ह्या कर्जांचा उपयोग करून द. युरोपांतील खालावलेल्या भूभागांचा आर्थिक विकास करण्यांत यावा.


# NOTICE

**The Presidency Industrial Bank Ltd., POONA.**

Notice is hereby given that the Seventeenth Annual General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank Ltd., Poona, will be held on Sunday the 18th Aprial 1954 at the "Commonwealth Building," Laxmi Road, Poona, at 4 P. M. to transact the following business:-

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet, and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1953.

*2. To declare a Dividend.

3. To elect the Directors in place of the retiring Directors, who being eligible, offer themselves for re-election.

4. To appoint Auditor or Auditors and to fix his or their remuneration. The present Auditors, M/s. B. C. Abhyankar & Co., retire and are eligible for re-election and offer themselves for the same.

5. To transact any other business as may be allowed by the Chairman.

By order,
C. T. CHITALE,
Managing Director.

Poona City,
26th March 1954.

* 1. The Transfer Books of the Bank will be closed from 10th April to 26th April 1954.



स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*ग्लेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक, बार्शी व लोंणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७२,६८००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | १–०–० |
| चालू डिपॉझिट | ” | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. ३१ मार्च, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन

भारतामधील खाजगी उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणण्यासाठीं एक खाजगी इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन स्थापन करण्याचे प्रयत्न सध्या चालू आहेत. अमेरिकन भांडवलदार आणि जागतिक बँकेचे प्रतिनिधी ह्यांच्याबरोबर हीं बोलणीं चालू होतीं. तींच पुढें चालविण्यासाठीं श्री. ए. डी. श्रॉफ हे सध्या अमेरिकेला गेले आहेत. संकल्पित कॉर्पोरेशन परदेशीय भांडवल व भारतीय भांडवल ह्यांच्या खाजगी मालकीचे राहील. तथापि, त्याला भारतीय सरकारचा पुरस्काराहि लाभेल, असें समजतें. ह्या बाबतींत प्राथमिक चौकशी करण्यासाठीं बॉस्टन मधील एक भांडवलदार मि. जॉर्ज वुडस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक मंडळहि नुकतेच भारतांत येऊन गेलें. सध्याच्या कल्पनेप्रमाणें कॉर्पोरेशनचें भांडवल ५ कोटी रुपयांचें राहील. त्याची उभारणी पुढीलप्रमाणें करण्यांत येणार असल्याचें समजतें. भारतामधून ३·५ कोटी रुपये उभारण्यांत येतील. १ कोटी रुपये ब्रिटनमधून जमविण्यांत येतील आणि उरलेलें अर्धा कोटी रुपये भांडवल अमेरिकेंतून जमाविण्यांत येईल. ह्याशिवाय आणखी ७ कोटी रुपयांच्या भांडवलाची भर त्यांत पडणार आहे. अमेरिकन सरकारच्या परराष्ट्रीय आर्थिक मदतीच्या व्यवस्थेप्रमाणें भारताला रेल्वे एंजिनें आणि पोलाद विकत घेण्यासाठीं कांहीं रक्कम मिळावयाची आहे. तीमधून वरील रक्कम कॉर्पोरेशनला मिळण्याचा संभव आहे. कॉर्पोरेशनची स्थापना झाल्यावर जागतिक बँकेकडूनहि कांहीं रक्कम कर्ज म्हणून मिळविण्याचे प्रयत्न होणार आहेत. कॉर्पोरेशनच्या स्थापनेची प्राथमिक तयारी करण्यासाठीं जी कमिटी भारतांत नेमण्यांत आली होती, तिचें अध्यक्षपद डॉ. रामस्वामी मुदलियार ह्यांच्याकडे आहे. डॉ. मुदलियाराहि लवकरच अमेरिकेला जाऊन श्री. श्रॉफ ह्यांच्याशीं सहकार्य करतील.

---

## दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनसाठीं कर्ज

दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनसाठीं गेल्या वर्षी जागतिक बँकेनें १·९५ कोटी डॉलर्स कर्ज मंजूर केलें होतें. पण आतां कर्जाची रक्कम १०५ कोटी डॉलर्स, म्हणजे सुमारें ५ कोटी रुपये, इतकीच देण्यांत येणार असल्याचें समजतें. कॉर्पोरेशनसाठीं देण्यांत येणाऱ्या कर्जाशिवाय भारतामधील आणखीहि कांहीं विकास कार्यक्रमांत जागतिक बँक भाग घेणार आहे अशी वार्ता आहे. ट्रॉम्बे येथें जें वीज-उत्पादन-केंद्र उभारण्यांत यावयाचें आहे त्याला आणि मुंबई राज्यांतील कोयनेच्या धरणाला बँकेकडून आर्थिक मदत मिळेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. ह्या दोन योजनांसंबंधीं जरूर ती सर्व तपशीलवार माहिती बँकेला ह्यापूर्वींच पुरविण्यांत आली आहे. माहितीचे दोन भाग सरळच पडतात. एका भागांत योजनेच्या तांत्रिक निर्दोषतेविषयीं ऊहापोह करण्यांत आला असून दुसऱ्या भागांत आर्थिक बाबींचा विचार करण्यांत आला आहे. जागतिक बँकेच्या तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत आलें असून वरील दोन योजनांमुळें मुंबई राज्यांतील कोणत्या भागांना विजेचा पुरवठा करतां येईल ह्याविषयीं ते तपासणी करीत आहे. विकास-योजनांसाठीं मिळणारी परदेशीय कर्जें कोणत्या अटींवर मिळतात हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. जागतिक बँकेकडून वरील दोन योजनांबाबत जें कर्ज मिळणार आहे त्याची रक्कम आणि अटी ह्यांविषयीं वाटाघाटी करण्यासाठीं भारतीय सरकार आपला एक अधिकारी वॉशिंग्टनला पाठविणार आहे, असें समजतें. भारतीय सरकारच्या अंदाजपत्रकावरील चर्चेला उत्तर देतांना अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं परकीय मदतीबद्दल आपण निराश झालेलों नाहीं, असें बोलून दाखविलें होतें. त्यांचा आत्मविश्वास अयोग्य नाहीं, असें दिसतें.

---

## भारतांत जेट विमानांचा कारखाना

भारत सरकार आणि ब्रिटनमधील सुप्रसिद्ध रोल्स रॉइस कंपनी ह्यांच्या दरम्यान सध्या वाटाघाटी चालू आहेत, असें समजतें. ह्या वाटाघाटी फलद्रुप झाल्या तर भारतांत जेट विमानांना लागणारीं एंजिनें तयार करण्याचा कारखाना लवकरच काढण्यांत येण्याचा संभव आहे. भारतामधील एका कंपनीशीं सहकार्य करूनच रोल्स राइस ही कंपनी कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. वाटाघाटींत अपेक्षेप्रमाणें प्रगति झाली तर रोल्स राइस कंपनी आपले कांहीं तज्ज्ञ भारतांत पाठविण्यास तयार आहे. हे तज्ज्ञ कारखाना काढण्यासाठीं योग्य अशी जागा पाहून भारत सरकारला सल्ला देतील. ह्या बाबतींत अधिक चौकशी करतां असें कळतें कीं, कारखाना निघून प्रत्यक्ष उत्पादनाला सुरवात होण्यास तीन-चार वर्षांची तरी अवधी लागेल. तथापि एका महत्त्वाच्या धंद्याच्या बाबत पहिलें पाऊल घेतलें जाऊन पुढील पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारत जेट विमानांच्या एंजिनाच्या उत्पादनाबाबत स्वयंपूर्ण होईल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. कारखाना उत्पादन करूं लागल्यावर त्यामुळें फक्त लष्करी विमानांच्या गरजाच भागविल्या जातील असें नाहीं. भारतीय विमानदलाप्रमाणेंच राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेल्या नागरी विमानवाहतुकीच्याहि गरजा कारखाना भागवूं शकेल. सध्या भारताला विमानांच्या बाबतींत मुख्यतः ब्रिटन आणि फ्रान्स ह्या देशांवर अवलंबून रहावें लागत आहे. पण सतत बदलत जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत हें परावलंबन धोक्याचें आहे. अर्थात्‌च, अशा प्रकारच्या कारखान्याची गरज अतिशय तांतडीची आहे हें स्पष्टच आहे.

---

**उत्तर प्रदेशांतील दुधाचा व्यवसाय**—उत्तर प्रदेशांतील दुधाच्या व्यवसायाची पहाणी करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. गायींच्या व शेळींच्या दुधाच्या उत्पादनाच्या खर्चाचीहि चौकशी करण्यांत येणार आहे. उत्तर प्रदेशांतील दुभत्या जनावरांची संख्या भारतांतील दुभत्या जनावरांच्या एक पंचमांश आहे, असा अंदाज करण्यांत आला आहे.

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December, 1953.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 1,00,000 shares of Rs. 50 each ... | | 50,00,000—0—0 |
| **Issued & Subscribed Capital** | | |
| 64,000 shares of Rs. 50/- each ... | | 32,00,000—0—0 |
| **Called and Paid-up Capital** | | |
| 64,000 shares of Rs. 50/-each Rs. 25/- per share called and paid up ... | | 16,00,000—0—0 |
| **Calls in Advance** ... | | 150—0—0 |
| **2. Reserve Fund & Other Reserves** | | |
| As per last Balance Sheet ... | 5,65,000—0—0 | |
| Additions during the year ... | 51,000—0—0 | 6,16,000—0—0 |
| **3. Deposits & Other Accounts** | | |
| Fixed deposits ... | 1,17,81,407—0—0 | |
| Savings Bank deposits ... | 1,41,93,178—8—2 | |
| Current accounts, Contingency accounts etc. ... | 89,56,528—1—3 | 3,49,31,113—9—5 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| ( i ) In India ... | 4,466-11—3 | |
| ( ii ) Outside India ... | nil | 4,466-11—3 |
| **Particulars:** | | |
| ( i ) Secured-by part of Govt. securities ... | 4,466-11—3 | |
| ( ii ) Unsecured ... | nil | |
| **5. Bills Payable** ... | | 2,74,489—7—0 |
| **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra:** | | |
| ( i ) Payable in India ... | 16,57,182—7—2 | |
| ( ii ) Payable outside India ... | nil | 16,57,182—7—2 |
| **7. Other Liabilities** | | |
| Unpaid dividend ... | 10,068—7-11 | |
| Rebate on bills discounted ... | 2,327-11—0 | |
| Branch adjustments ... | 3,50,300—6—7 | 3,62,696—9—6 |
| **8. Acceptances, Endorsements & Other Obligations per Contra:** | | 3,19,260—0—0 |
| **9. Profit and Loss** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 3,09,369-14-10 | |
| Less appropriations :— | | |
| Reserve Fund Rs. 51,000-0-0 | | |
| Provision for Income-tax and Super-tax Rs. 1,20,000-0-0 | | |
| Dividend Rs. 80,000-0-0 | 2,51,000—0—0 | |
| | 58,369-14-10 | |
| Add—profit for the year ( subject to taxation ) brought from the Profit and Loss account ... | 2,88,857-13—6 | 3,47,227-12—4 |
| **10. Contingent Liabilities** | | |
| On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company ... | 1,35,950—0—0 | |
| Total Rs. ... | | 4,01,12,586—8—8 |

( See Profit and Loss Account on Page 104 )

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December, 1953.*

## PROPERTY AND ASSETS

| Particulars | | Rs. As. Pa. | Rs. As. Pa. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank ( Including foreign currency notes ) ... | | | 40,51,145—2—8 |
| **2. Balances with other Banks ( in current account )** | | | |
| ( i ) In India ... | | 5,26,742—7—0 | |
| ( ii ) Outside India ... | | Nil | 5,26,742—7—0 |
| **3. Money at Call and Short Notice** ... | | | 3,00,000—0—0 |
| **4. Investments at Cost** | | | |
| ( i ) Securities of the Central and State Governments and other trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments. ( Out of these securities of the face value of Rs. 64,31,000/-are with banks for over-draft arrangements ) ( Market value Rs. 1,29,40,618-14-0 ) ( Face value Rs. 1,37,08,200-0-0 ) ... | | 1,35,21,589—5-10 | |
| ( ii ) **Shares:** | | | |
| Ordinary shares ( fully paid up ) ( Market value Rs. 1,23,465-0-0 ) | Rs. 1,19,005-12—3 | | |
| Preference shares (fully paid-up) below cost ( Market value Rs. 2,73,808-12-0 ) | Rs. 2,72,756—0—6 | | |
| Ordinary shares ( partly paid-up ) below cost ( Market value Rs. 39,120-8-0 ) | Rs. 38,205—0—0 | 4,29,966-12—9 | |
| (iii) Debentures or bonds ( Market value Rs. 14,280/-) ... | | 14,000—0—0 | |
| (iv) Other investments: | | | |
| Stock for £ 200 @ cost Rs. 8,200 | Rs. 8,200—0—0 | | |
| Less received towards repayment of capital | Rs. 5,979—3-10 | 2,220-12—2 | |
| ( v ) Gold ... | | Nil | 1,39,67,776-14—9 |
| **5. Advances** | | | |
| ( Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors ): | | | |
| (1) Loans, Cash-credits, Over-drafts etc. | | | |
| ( i ) In India | Rs. 1,70,42,096—0—9 | | |
| ( ii ) Outside India | Nil | 1,70,42,096—0—9 | |
| (2) Bills discounted and purchased ( Excluding Treasury Bills of the Central and State Governments ) | | | |
| ( i ) Payable in India | Rs. 5,80,451-15—3 | | |
| ( ii ) Payable outside India | Nil | 5,80,451-15—3 | 1,76,22,548—0—0 |
| Particulars of Advances ( *See Page 104* ) | | | |
| **6. Bills Receivable being Bills for Collection per Contra :** | | | |
| ( i ) Payable in India ... | | 16,57,182—7—2 | |
| ( ii ) Payable outside India ... | | Nil | 16,57,182—7—2 |
| **7. Constituents' Liabilities For Acceptances, Endorsements and Other Obligations, Per Contra :** ... | | | 3,19,260—0—0 |
| **8. Fixed Capital Expenditure** | | | |
| **(1) Land and Building At cost** | | | |
| as at 31-12-1952 | Rs. 2,30,199-15—6 | | |
| Less—Adjustments | Rs. 5,199-15—6 | | |
| | Rs. 2,25,000—0—0 | | |
| Add total cost of building Completed during the year | Rs. 5,41,406—7—9 | | |
| | Rs. 7,66,406—7—9 | | |
| Less depreciation to date | Rs. 6,500—0—0 | 7,59,906—7—9 | |
| **(2) Safe Deposit Vault at Cost** | | | |
| As per last Balance Sheet | Rs. 1,69,458—1—9 | | |
| Addition during the year | Rs. 343—1—9 | | |
| | Rs. 1,69,801—3—6 | | |
| Less depreciation to date | Rs. 13,862—3—6 | 1,55,939—0—0 | 9,15,845—7—9 |
| **9. Furniture, Fixtures, Motor Car Etc. at Cost** | | | |
| As per last Balance Sheet ... | | 1,48,009-15—1 | |
| Additions during the year ... | | 1,49,689—4—1 | |
| | | 2,97,699—3—2 | |
| Less depreciation to date ... | | 49,969-15—0 | 2,47,729—4—2 |
| **10. Other Assets, Including Silver.** | | | |
| Stamps on hand ... | | 1,341—7—3 | |
| Tax paid in advance and at source ... | | 2,04,447—1—8 | |
| Interest accrued on investments ... | | 66,388—2—8 | |
| Sundry advances ... | | 1,11,180—1—7 | |
| Shares of the Executor and Trustee Co. (Partly paid-up) | | 1,21,000—0—0 | 5,04,356-13—2 |
| **11. Non-Banking Assets Acquired In Satisfaction Of Claims** | | | Nil |
| Total Rs. ... | | | 4,01,12,586—8—8 |

( See Profit and Loss Account on Page 104 )

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1953 on page 103**

| Particulars of Advances : | Rs. As. Ps. |
|---|---|
| ( i ) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 1,39,22,007—0—0 |
| ( ii ) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 8,36,254—0—0 |
| ( iii ) Debts considered good secured by the personal liabilites of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 28,64,287—0—0 |
| ( iv ) Debts considered doubtful or bad not provided for ... | Nil |
| | 1,76,22,548—0—0 |
| ( v ) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 7,59,946-12—8 |
| ( vi ) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 14,62,604—4—8 |
| (vii) Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 7,59,946-12—8 |
| (viii) Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 19,10,050—6—2 |
| ( ix ) Due from banking companies ... | 2,78,654—3—7 |

## *Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1953*

| EXPENDITURE | Rs. As.Ps. | INCOME | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on deposits, borrowings, etc. ... | 5,28,281—5—9 | (Less provisions made during the year for bad and doubtful debts and other usual or necessary provisions) | |
| 2. Salaries allowances and provident fund : Manager 14,900—0—0; Others 4,13,793—5–10 | 4,28,693—5–10 | 1. Interest and discount ... | 13,17,171-12—6 |
| 3. Directors' & Local Advisory Committee members' fees & allowances | 8,900—0—0 | 2. Commission, exchange, brokerage | 1,21,617—6—7 |
| 4. Rent, taxes, insurance, lighting, etc. | 49,648—8—3 | 3. Rent (Less taxes and other charges) | 1,597—5—9 |
| 5. Law charges ... | 4,591—6—9 | 4. Net profit on sale of investments, gold and silver, land premises and other assets (not credited to Reserves or any particular fund or account) ... | Nil |
| 6. Postage, telegrams, stamps and telephone ... | 27,614-12-10 | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land premises and other assets (not credited to Reserves or any particular fund or account) ... | Nil |
| 7. Auditors' fees ... | 2,500—0—0 | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets ... | Nil |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property | 18,721—6—0 | 7. Other receipts : Transfer fees 524—0—0; Lockers rental 10,895—6—0 | 11,419—6—0 |
| 9. Stationery, printing, advertisement, etc. ... | 57,301—6—2 | | |
| 10. Loss from sale of or dealing with non-banking assets ... | Nil | | |
| 11. Other expenditure : Sundry charges 27,946-8-3; Travelling & conveyance 8,749-5-6 | 36,695-13—9 | | |
| 12. Banlance of profit (subject to Taxation) carried to Balance Sheet | 2,88,857-13—6 | | |
| Total Rs. ... | 14,51,805-14-10 | Total Rs. ... | 14,51,805-14-10 |

**Statement pursuant to Section 132-A of the Indian Companies Act of 1913 as amended by Act XXII of 1936.**

The Profit of The Subsidiary Company viz. The Maharashtra Executor and Trustee Company Limited, for the year ended 31st December 1953 has been carried forward into the accounts of that Company.

G. L. Halbe, *Accountant* C. V. Joag, *Manager* V. P. Varde, *Chairman*

S. G. Marathe, D. K. Sathe, M. V. Shah, N. G. Pawar, M. R. Joshi, B. M. Gupte, F. D. Pudumjee, S. L. Kirloskar — *Directors*

POONA CITY,
24th January, 1954.

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra, Ltd., as at 31st December 1953, and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited accounts of Bombay, Girgaon, Dadar, Sholapur (Phaltan Galli and Murarji Peth) and Nagpur Branches and certified returns of other Branches and report that :

(a) We have obtained all the information and explanations we have required; (b) In our opinion the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law; (c) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the State of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the Books of the Bank; and (d) In our opinion, Books of Account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act.


We have to report further that: (e) The information and explanations required by us have been found to be satisfactory; (f) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion, have been within the powers of the Bank; (g) The returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit; (h) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of profit for the period covered by such account.

Poona City, G. D. APTE, B. A., G. D. A., F. C. A. KULKARNI and KHANOLKAR.
24th January, 1954. *Chartered Accountant, Poona 2.* *Chartered Accountants, Bombay.*

( See Balance Sheet on Page 102 and 103 )

# दि बेळगांव बँक लि., बेळगांव

## डायरेक्टर, श्री. गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., यांचें बोर्डातर्फे २४ व्या वार्षिक सभेंत भाषण



श्री. गो. वि. सराफ,
बी. ए., एलएल. बी.

“आपल्या बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या वतीनें ३१ डिसेंबर १९५३ अखेरच्या सालचा अहवाल व ताळेबंद आपल्या मंजुरीसाठी सादर करण्यास मला फार आनंद वाटतो. या निमित्तानें या सालांत झालेल्या प्रमुख आर्थिक घटनांचा निर्देश करून त्याचे परिणाम बँकिंग-च्या धंद्यावर कसे दिसून आले याचा स्थूलमानानें विचार करणें उद्बोधक वाटेल. या दृष्टीनें पाहतां १९५३ साल हें अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनांतून परस्पर-विरोधी वाटणाऱ्या अशा योजना व घटना यांनीं भरलेलें आहे, असें वाटतें. १९५१ च्या अखेरीस सरकारनें बँकरेट वाढवून पत नियंत्रणाचें व चलन संकोचाचें धोरण अवलंबिलें. त्याचे बरेवाईट परिणाम संपूर्णपणें प्रभावी होण्यापूर्वीच गेल्या फेब्रुवारीचे (१९५३) अंदाजपत्रकांत पंचवार्षिक योजनेच्या खर्चासाठी तुटीच्या अर्थसंकल्पाचा (डेफिसिट फायनान्सिंग) अवलंब करण्याचें सरकारचें धोरण जाहीर केलें. याच सालीं एकंदरींत औद्योगिक उत्पादनांत वाढ झाल्याचें स्पष्ट असलें तरी बेकारीचे प्रमाणांतहि वाढ होत असून, याला आळा कसा घालतां येईल याची विवंचना सर्वांनाच वाटत आहे. अतिवृष्टीमुळें बऱ्याच भागांत पिकें बुडालीं तरी एकंदरींत धान्योत्पादनांत स्पृहणीय वाढ दिसून येऊन निर्नियंत्रणामुळें साधारण जनतेस स्वातंत्र्य खऱ्या अर्थानें दिसूं लागलें. मात्र या तादृश विरोधी वाटणाऱ्या घटनांचा एकंदरींत परिणाम, अल्पांशानें तरी पंचवार्षिक योजनेनुसार देशाचीं पाउलें प्रगतिपथावर पडत असून धान्योत्पादनाचा मुख्य प्रश्न आटोक्यांत आल्यामुळें सरकारला व खासगी संस्थांनाहि औद्योगिक वाढीकडे जास्त लक्ष पुरवितां येण्यांत होईल. धान्य-परिस्थिति सुधारेल, त्याप्रमाणें मजुरीचे दर व इतर खर्च यांत बचत होणें शक्य होईल, असें व्यावहारिक दृष्टया म्हणण्यास हरकत नाहीं. कोयना योजनेच्या प्रत्यक्ष कामगिरीस नुकतीच सुरवात झाल्यानें महाराष्ट्रीयांना तरी पंचवार्षिक योजनेच्या प्रगतीचें इष्ट तें प्रत्यंतर पाहण्यास मिळत आहे.

### सरकारी धोरणाचे परिणाम

“तुटीच्या अर्थसंकल्पाच्या धोरणाचा परिणाम, सुरुवातीस धान्याच्या व आवश्यक वस्तूंच्या किंमतींत वाढ होणेंत दिसून आला. याजबरोबर कांहीं पैशांच्या पिकांच्या (मनीक्रॉप्स) किंमती घसरल्यामुळें जनतेची क्रयशक्ति कमी होऊन अन्नधान्यासाठीच जास्त पैसा खर्चावा लागल्यानें कपडालत्ता वगैरेसाठीहि पैशाची टंचाई मध्यम व खालच्या वर्गास भासूं लागली. कापडावरचें नियंत्रण उठविण्यांत आलें तरी कापडबाजारांत गिऱ्हाइकांची कमालीची वाण दिसून आली. रोखे व शेअर बाजारावरहि या धोरणाचें प्रतिबिंब स्पष्टपणें पडल्याचें दिसून येईल. गेलीं दोन वर्षें खालीं पडून राहिलेल्या या बाजारांत वर्षअखेरपर्यंत चांगलीच तेजी दिसून आली. याचीं कारणें चलनविस्ताराबरोबरच उत्पादनांतील वाढ, निर्यातीचें अनुकूल धोरण व टाटा स्टील कंपनीच्या डिफर्ड भागांचे ऑर्डीनरीमध्यें रूपांतर करण्याच्या योजनेस मिळालेलें यश हीं होत. इतर देशांनीं बँकरेट उतरविल्यामुळें येथेंहि तो उतरविण्यांत येणार अशी अपेक्षा निर्माण होऊन रोखे बाजारांत आशादायक वातावरण निर्माण झालें. बँकांनीं आपल्याकडील रोख्यांची किंमत चालू बाजारभावांत दाखविण्याची आवश्यकता नसल्याची सवलत रिझर्व्ह बँकेकडून याच सालीं देण्यांत आली, हेंहि नमूद करणें इष्ट वाटतें. चलनवाढीच्या धोरणानुसार मोठ्या रकमांच्या नोटांचा प्रसार सरकारकडून पुनः करण्यांत येण्याचा आहे. खाजगी धंद्याच्या क्षेत्रांत जास्त सवलती व वाव मिळण्याबाबत सरकारकडून अनेकदां आश्वासनें देण्यांत आलीं.

“अशा रीतीनें वरच्या वर्गांत जरी उत्साहाचे वारे खेळत असलें तरी मध्यम व कनिष्ठ वर्गाचे वाट्यास क्रयशक्ति कमी होऊन बेकारींत वाढ होण्याचेच परिणाम दिसून येत आहेत. निर्नियंत्रणामुळें बराच नोकरवर्ग कमी झाल्यानें बेकारींत आणखी भरच पडत आहे. यांतच जमिनीबाबतचे कायद्यानें मालकवर्गाच्या अडचणींत भरच पडत असून कसणारा शेतकरीहि अतिवृष्टीनें पिकें बुडाल्यामुळें व मशागतीच्या वाढत्या खर्चामुळें बेजार होऊन गेला आहे. कोष्टी वर्ग पूर्वीप्रमाणेंच दुःखी आहे. मोठीं शहरें वगळलीं तर देशाच्या आंतील भागांत कामगारवर्ग वाढत्या प्रमाणांत बेकार आहे. बाजारावर खरेदीदारांची सत्ता रूढ होऊन विक्रीचें व नफ्याचें प्रमाण यांत कमालीची घट दिसून येत आहे. त्या प्रमाणांत खर्चाचा व कराचा बोजा मात्र कमी होत असल्याचें दिसून येत नाहीं.

### बँकिंगवरील परिणाम

“बँकिंगच्या बाबतींत स्थूलमानानें अहवालाचें वर्ष स्थिरतेचें गेलें असें म्हटलें तरी वरील नव्या धोरणांचें प्रतिबिंब या धंद्यावरहि पडल्याचें दिसून येतें. येणें व्याजाचे मानानें देणें व्याजाचा बोजा वाढल्यामुळें, तसेच इतर खर्च व नोकर-पगार यांतहि बरीच वाढ झाल्यानें बऱ्याच बँकांचा निव्वळ नफा कमी झाला आहे.

“मुदत ठेवींत वाढ झाल्यानें व कर्जावरील व्याजांत जास्त व्याज न मिळाल्यामुळें नफ्यांत घट होणें स्वाभाविकच ठरतें. याहीपेक्षा गेलीं दोन वर्षें कर्जाच्या मागणीबाबत एक विशिष्ट अनुभव येत आहे, तो म्हणजे हंगामास उशीरा म्हणजे डिसेंबरच्या मध्यापासून सुरुवात होऊन जून अखेरीस सर्व रक्कम परत येणें. यापूर्वी मालतारणावरील कर्जाऊ रकमा साधारणपणें

सात ते आठ महिनेपर्यंत व्याज मिळवीत असत. परंतु सध्यांच्या विशिष्ट परिस्थितीत व्यापारी, माल ठेवून व्याजाचा बोजा वाढवून दराचा धोका पत्करण्यापेक्षा आटेलें गिऱ्हाईक पदरांत पाडून घेण्यासच उत्सुक आहे. वाटल्यास पुन: नवीन गोदाऊन करावें, परंतु धोका नको. यामुळें जूनपर्यंत बँकांच्या व्यवहारांत कमालीची उलाढाल होऊन भरपूर प्राप्ति होत असली तरी पुढील सहामाहींत त्यांत कांहींच भर पडत नाहीं, असाच छोट्यामोठ्या सर्व बँकांचा अनुभव आहे. धान्यावरील नियंत्रणें उठल्यामुळें यांत कांहीं बदल होणेचा संभव निर्माण झाला आहे. सध्यांच्या परिस्थितींत बँकांना आपल्या नफ्यांत वाढ दाखविणें कठीण पडत आहे.

### बेळगांव बँकेची प्रगति

"खुद्द स्वत:विषयीं आतां सांगतांना १९५३ चें साल अनेक दृष्टींनीं आमच्या संस्थेस महत्त्वाचें गणलें पाहिजे. आमची स्वत:ची इमारत याच वर्षांत पुरी होऊन त्यांत आमचा कारभार रीतसर सुरू करण्यांत आला आहे. सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा उपयोग नागरिकांना वाढत्या प्रमाणांत होत असून यापेक्षा जास्त सोय उपलब्ध व्हावी अशी मागणी येत आहे. या वर्षी ठेवीमध्यें ९ लाखांची वाढ होऊन आमचें खेळतें भांडवल एक कोटीच्या वर गेल्याचें ताळेबंदावरून आपणांस दिसलेंच आहे. आमच्या आकांक्षेचा हा पहिला टप्पा आम्हीं यंदा गांठला आहे. पुढील काळांत यांत याहींपेक्षा जास्त प्रगति होणेची उमेद आम्हांस वाटणें साहजिक आहे. जयसिंगपूर या वाढत्या व्यापारी शहरांत ता. १ जानेवारी, १९५४ रोजीं नवी शाखा उघडल्याचें आपणांस समजलेंच आहे. पुढील जानेवारींत बँक स्थापन होऊन २५ वर्षे पुरीं होत असल्यानें रौप्यमहोत्सव-समारंभ योग्य रीतीनें साजरा करण्याची बोर्डाची शिफारस आपणां सर्वांस मान्यच होईल.

"वरील सर्व घटनांवरून बँकेची प्रगति योग्य रीतीनें होत असून वाढत्या ठेवींवरून जनतेचा विश्वास दृढ होत असल्याचें स्पष्ट होत आहे. बँकेचा व्यवहार सर्व दृष्टींनें वाढता असून ठोक नफा वाढत्या प्रमाणांत होत आहे. परंतु नोकरपगाराबाबतची युनियनकडून झालेली मागणी तडजोडीनें पुरी करण्याकरितां यंदा बरीच रक्कम द्यावी लागल्यानें निव्वळ नफ्यांत घट दिसत आहे. खर्चाचे नवीन नवीन बोजे सहन करूनहि फायद्याचें प्रमाण आजतागायत टिकून राहिलें आहे. यावरूनच आपल्या बँकेच्या सर्व शाखांमधून जनतेस मिळणाऱ्या सेवेची आवश्यकता व उपयुक्तता स्पष्ट होत आहे व यामुळेंच भविष्यकाळांत याहींपेक्षा जास्त प्रगति होईल अशी आम्हांस उमेद वाटते. यंदाचें वर्ष आणखी एका दृष्टीनें महत्त्वाचें ठरणार आहे. बँकेनें सुरुवातीपासून ६¼% टक्के प्रमाणें करमाफ डिव्हिडंड दिलेलें आहे; परंतु बदलत्या परिस्थितींत रिझर्वची तरतूद भरपूर करण्याचे दृष्टीनें व त्यासाठी देण्यांत येत असलेलें डिव्हिडंडचें प्रमाण कमी करणेचा योग्य असा निर्णय बोर्डानें पूर्ण विचारांतीं घेऊन चालू सालीं ५% करमाफ डिव्हिडंड देण्याची शिफारस केली आहे. दूर दृष्टीनें पाहतां ही योजना जास्त हितकारक ठरणार असल्यानें त्याला आपली मान्यता मिळेल असा विश्वास वाटतो.

"या प्रसंगीं, सरकारकडून ज्या ठिकाणीं बँका करवसुलीची कामें व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीं करीत असतात त्यांचेकडून अवास्तव रक्कम रोख जामिनकीसाठीं मागण्यांत येत आहे. याचा उल्लेख करणें आवश्यक वाटतें. आतांपर्यंत बँकांकडून सदर रकमांचा इन्डेमनिटी बॉंड घेऊन हें काम करतां येत असे. कांहीं कारणांमुळें सरकारला जास्त सुरक्षिततेची जरूरी वाटत असल्यास सरासरीनें वसूल होत असलेल्या रकमेपुरती योग्य जामीनकी सरकारी कर्जरोख्यांच्या रूपांत घेण्यांत यावी, ही बँकांची मागणी योग्य व व्यवहारास धरून आहे, असेंच कोणासहि वाटेल. तरी सरकारकडून याबाबत योग्य तो विचार होऊन चालू व्यवहारास इष्ट तो वाव मिळेल अशी आशा वाटते.

### संचालकांवरील वाढत्या जबाबदाऱ्या

"पुढील काळांत देशाच्या प्रगतींत बँकांना योग्य तो भाग घेतां यावा या दृष्टीनें रिझर्व बँकेकडून जरूर ती पूर्वतयारी होत आहे. "ब" वर्गाच्या प्रमुख राज्यांत रिझर्व बँकेनें आपला कारभार आतां सुरू केला असून शेतीच्या धंद्यास व खाजगी उद्योगधंद्यास बँकांना कोणत्या प्रकारें मदत करतां येईल याची चौकशी करण्याकरितां कमिट्या नेमल्या आहेत. मात्र रिझर्व बँक बँकिंगच्या धंद्यांतील अनिष्ट प्रवृत्तीस आळा घालून ठेवीदारांच्या हितास धोका देणाऱ्या संस्था यापुढें अस्तित्वात ठेवूं इच्छित नाहीं, हें स्पष्ट होत आहे. आतांपर्यंत अशा संस्थांना शक्य त्या सवलती व सल्ला देऊन संधि दिली, परंतु जेथें अपेक्षेप्रमाणें सुधारणा दिसून आली नाहीं त्यांना लायसेन्स नाकारण्यांत आलें. अशा बँकांची या सालांतील संख्या पांच आहे. लगतच्या काळांत रिझर्व बँक अशा संस्थांबाबत कडक धोरण स्वीकारणार, हें स्पष्ट होत आहे. तरी लहान बँकांच्या संचालकांनीं आपल्यावरील जबाबदारी समजून घेऊन त्यानुसार दक्षता घेणें अगत्याचें आहे. नवीन कंपनी कायद्यान्वयें संचालकवर्गावर जीं बंधनें व जबाबदाऱ्या घालण्यांत आल्या आहेत त्याहि नीट समजून घेणें अगत्याचें आहे."


दि

बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

भांडवल

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल .... | रु. | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल .... | रु. | ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड .... | रु. | ७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल.... | रु. | ४ कोटींचे वर |

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष)
श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे
श्री. न. ग. पवार
श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो. पदमजी
श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. भा. म. गुप्ते

चिं. वि. जोग,
मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.